नियमीत फौजदारी खटला क्र. **७१/२०२४**
निशाणी क्र. **१६/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०१** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **प्रकाश जगन्नाथ ठाकूर** |
| वय सुमारे | : | ७० वर्षे, व्यवसाय : शेती |
| निवासस्थान | : | मु. सहाणगोठी, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहा. सरकारी वकील श्री. प्रसाद पाटील यांचेमार्फत</u>** :

घटना दि. २२/०३/२०२४ रोजी रात्री १०.१५ वाजता घडली. घटनेच्या पूर्वी २० दिवस आधी शेडचा पत्रा तुटला होता त्यावेळी मी नरेशला विचारले होते की कोण भरुन देईल? त्यावेळी तो मला म्हणाला होता की, मी नवीन बनवून देईन. सदरचा पत्रा हा रस्त्याचे काम चालू असताना तुटला होता. पंचायतीमार्फत रस्त्याचे काम चालू होते. नरेश हा पंचायत सदस्य असल्याने त्याने सांगितले होते की ते भरुन देतील.

०२ दि. २२/०३/२०२४ रोजी रात्री १०.१५ वाजता नरेश वर्तक माझ्या घरासमोरुन जात असताना मी त्याला विचारले की, माझा पत्रा तू कधी बनवून देणार? त्यावर तो म्हणाला की, आता बनवून देणार नाही, तुला काय करायचे ते कर. आमच्यात वाद चालू असताना गुरुनाथ सदानंद पोईलकर हा पाठीमागून आला. तो घरातून कोयता घेवून आला व माझी झाडे तोडू लागला. त्यानंतर त्याचा भाऊ नवनाथ आला व तोही शिवीगाळ करु लागला. 'भेंदचोद, मादरचोद, तू घरातून बाहेर ये तुला ठार मारुन टाकतो.' अशी शिवीगाळ करु

लागला. त्यानंतर त्या तिघांनी आमच्या अंगणातील बांबू व पत्र्याची मोडतोड केली. त्यानंतर ते दोघे घरात आले. नवनाथ याने घराच्या दरवाजावर लाथ मारली आणि मला माझा डावा हात पकडून बाहेर ओढले आणि कोयत्याची मूठ माझ्या तोंडावर गुरुनाथ याने मारली. मी रक्तबंबाळ झालो. त्यानंतर मी पोलीस ठाण्यात आलो. त्यानंतर पोलीसांनी मला सिव्हील हॉस्पीटलमध्ये पाठविले. मला रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर मी आरोपींवर केस केली. मला तक्रार दाखवल्यास मी ओळखू शकेन. आता मला दाखवण्यात आलेली तक्रार तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. पी—१** म्हणजेच **निशाणी क्र. १७** देण्यात येते. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकेन. आरोपी आज न्यायालयात हजर आहेत. मला ज्या कोयत्याने मारहाण झाली तो दाखवल्यास मी ओळखू शकेन. आता मला दाखवण्यात आलेला कोयता तोच आहे. त्यास **मटेरियल ऑब्जेक्ट—१** (MO-1) देण्यात येते.

०३. सदर घटनेच्या तपासाकरीता पोलीस माझ्या घरी आले होते. त्यावेळी मी पोलीसांना घटनास्थळ दाखविले. आरोपीने कोयत्याच्या मुठीने माझ्या ओठावर मारले होते. मला ओठावर टाके पडले होते.

**सरतपास पूर्ण**.

**उलटतपास आरोपींकरीता वकील सौ. मानसी म्हात्रे यांचेमार्फत** :

०४. हे म्हणणे खरे आहे की, माझे पत्र्याचे शेड तुटले होते ही वेगळी घटना होती व बांबूच्या आणि झाडाच्या फांद्या तोडल्या ही वेगळी घटना होती.

हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घरासमोरुन सार्वजनिक रस्ता जातो. हे म्हणणे खरे आहे की, सार्वजनिक रस्त्याचे काम पंचायत करत होती. हे म्हणणे खरे आहे की, नरेश वर्तक हा कंत्राटदार नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, कंत्राटदार किंवा ग्रामपंचायत नुकसान भरपाई भरुन देत असते.

**प्रश्न** : कायद्याने नुकसान भरपाई करुन देण्यास नरेश वर्तक बांधील नव्हता?

**उत्तर** : त्याने होकार दिला होता.

**प्रश्न** : नरेश वर्तक याने ग्रामपंचायतीमध्ये सरपंच, ग्रामसेवक यांच्या समक्ष नुकसान भरपाई करुन देण्याची कबुली दिली होती का?

**उत्तर** : नाही.

हे म्हणणे खरे आहे की, नरेश वर्तक याने मला कोणतीही लेखी हमी देखील दिली नव्हती.

०५. हे म्हणणे खरे आहे की, नवनाथ व गुरुनाथ हे माझे शेजारी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, नरेश वर्तक हा माझा शेजारी नाही. हे म्हणणे खरे आहे की, नरेश वर्तक याचा माझ्या झाडांशी काहीही संबंध नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, नवनाथ व गुरुनाथ यांच्याशी झालेल्या वादाशी नरेश वर्तक याचा काहीही संबंध नव्हता. पोलीसांना फिर्याद देताना मी नरेश वर्तक याने माझे पत्रे तोडले ही बाब सांगितली नव्हती.

०६. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शेवग्याच्या झाडाच्या फांद्या रस्त्यावर आलेल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, नवनाथ व गुरुनाथ ह्या

घटनेपूर्वी माझे दुश्मन नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, नवनाथ व गुरुनाथ यांनी मला झाडांच्या फांद्या तोडण्यास सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराच्या आजूबाजूला दाट लोकवस्ती आहे. आमचा वाद अर्धा तास चालू होता. हे म्हणणे खरे आहे की, वाद बघण्यासाठी आजूबाजूचे अनेक लोक उभे होते. हे म्हणणे खरे आहे की, बरेच त्रयस्थ इसम तेथे उभे होते.

०७. हे म्हणणे खरे नाही की, फांद्या कधी तोडल्या होत्या हे मी पाहिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, फांद्या तोडताना मी आरडाओरडा करुन लोक जमविले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, सदर बाब मी लोकांच्या निदर्शनास आणून दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सार्वजनिक रस्त्यावर लाईटचे पोल आहेत.

०८. आरोपीने मला तोंड पकडून मारले नव्हते. माझ्या नाकावर मारले नव्हते ओठावर मारले होते. हे म्हणणे खरे नाही की, मला घटनेपूर्वी दोन दिवस आधीच लागले होते. मी माझी पत्नी व मुलासोबत दवाखान्यात गेलो होतो. माझ्या पत्नीने डॉक्टरांना सांगितले होते की कोयत्याच्या दांडक्याने ओठावर मारले होते. मी तीन दिवस दवाखान्यात होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी तीन दिवसांनंतर दवाखान्यातून आल्यावर फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, तोपर्यंत सदरची घटना कोणालाच माहिती नव्हती.

०९. हे म्हणणे खरे आहे की, माझ्यात व आरोपींमध्ये राजकीय पक्षीय वाद आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना त्रास देण्याकरीता खोटी केस केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी माझ्या झाडाच्या फांद्या

तोडल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, कोणतीही घटना घडलेली नसताना मी खोटी फिर्याद दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, नरेश वर्तक हा ग्रामपंचायत सदस्य असल्याने त्याला त्रास देण्याकरीता मी खोटी केस दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मटेरियल ऑब्जेक्ट–१ (MO-1) कोयता हा माझ्या घरातील आहे. हे म्हणणे खरे आहे की, गावातील घरात कोयते असतात. हे म्हणणे खरे नाही की, मी अंदाजाने आज कोयता ओळखलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी घरात काम करताना माझ्या ओठाला लागले होते.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **०४/०९/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.